"आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास"

(विशेष संदर्भ: किनवट व माहूर तालुका)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतील मराठी विषयाच्या पीएच. डी. पदवीकरीता सादर करावयाच्या शोधप्रबंधांचा आराखडा

:: संशोधक ::

अजय मारोती पाटील

एम.ए, एम.एड, नेट(मराठी),नेट(इतिहास),सेट(शिक्षणशास्त्र)

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ.राजू श्रावण मोतेराव

एम.ए,एम.एड,सेट,नेट,पीएच.डी

सरस्वती अध्यापक महविद्यालय, किनवट

:: संशोधन केंद्र ::

भाषा, वाङमय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च 2022

"आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य :एक चिकित्सक अभ्यास"

Ø **प्रास्ताविक:-**

मराठी साहित्यामध्ये लोकसाहित्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण लोकसाहित्य ही वैशिष्टपूर्ण अशी स्वतंत्र अभ्यास शाखा आहे. लोकसाहित्यात समाज जीवनातील सर्व अंगांना स्पर्श करण्याची क्षमता आहे. लोकसाहित्य हे विविध कलाप्रकारांची गंगोत्री आहे. लोक माणसातील अनेक कृती-युक्तीचा अभ्यास हा लोकसाहित्यात केला जातो. त्याचसाठी मी **'आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास'** हा विषय निश्चित करून आदिवासीतील परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचा निश्चय केला आहे.

महाराष्ट्रामध्ये आदिवासी परधान जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याला 'किनवट व माहूर' तालुका सुध्दा अपवाद नाही. लोकसाहित्याचा अभ्यास करणे हा उदात्त दृष्टिकोन माझ्या संशोधन विषयाचे प्रयोजन आहे. या अनुषंगाने किनवट व माहूर तालुक्यात आदिवासी परधान जमातीची लोकसंख्या बऱ्याच प्रमाणात असल्यामुळे विशेष संदर्भ म्हणून 'किनवट व माहूर' तालुक्यांची निवड करण्यात येत आहे.

आदिवासीतील परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे त्यांच्या लोकजीवनाचा, लोकसंस्कृतीचा, लोकमाणसाचा अभ्यास करणे होय. हे लोकजीवन, लोकसंस्कृती जनमानसाना समजून घेण्यासाठी आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण या लोकसाहित्यात त्यांची लोकसंस्कृती दडलेली आहे. या लोकसाहित्याचे संकलन करीत असताना आदिवासी परधान कुटुंबाची ओळख होईल. या कुटुंबाच्या ओळखीतून, गावातील, तालुक्यातील व

जिल्ह्यातील आदिवासी परधान जमातीची ओळख होईल. या अनुषंगाने लोकसाहित्य जपणाऱ्या लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतील. त्यामुळे निसंकोचपणे मी हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. या संशोधनातून आदिवासी परधान जमातीच्या चालीरीती, रूढी-परंपरा, प्रथा, देव-देवता, श्रध्दा-अंधश्रध्दा इत्यादीची माहिती मिळेल. ज्यातून सामाजिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्थितीचे दर्शन होईल. पर्यायाने त्यांच्या लोकसंस्कृतीचा अभ्यास करता येईल. याच अनुषंगाने किनवट व माहूर तालुक्यातील आदिवासीतील परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास या संशोधन विषयाच्या निमित्ताने करता येईल.

Ø **विषय निवडी मागील भूमिका:-**

किनवट व माहूर तालुक्यात अनेक जाती, धर्माची व लोकसंस्कृतीची जोपासना करणारे लोक राहतात. त्यापैकीच आदिवासी 'परधान' जमाती एक जमात असून त्याची एक वेगळी वैशिष्ट्यपूर्ण लोकसंस्कृती आहे. ही लोकसंस्कृती त्यांच्या लोकसाहित्यात दडलेली आहे. या जमातीला लोकसंस्कृतीचे वेगळेपण जोपासणारी जमात म्हणून सुद्धा ओळखले जाते. म्हणून त्यांच्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. करिता संशोधकाने **'आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास'** हा संशोधन विषय निवडलेला आहे. या संशोधनातून आदिवासीतील परधान जमातीची लोकसंस्कृती, भाषिक संस्कृती, जीवनपद्धती यांचा स्वतंत्र अभ्यास होणार असल्यामुळे या संशोधन विषयाला महत्त्व आहे.

Ø **संशोधनाची उद्दिष्टे:-**

१. आदिवासी परधान जमातीचा शोध घेणे.

२. आदिवासी परधान जमातीच्या उत्पत्ती व विकासाचा अभ्यास करणे.

३. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचा शोध घेणे.

४. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचे वेगळेपण अभ्यासणे.

५. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्यातील बदलते प्रवाह शोधणे.

६. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्यातील सामाजिक जाणिवांचा शोध घेणे.

Ø **संशोधनाची गृहितके:-**

१. आदिवासी जमातीत परधान ही एक स्वतंत्र जमात आहे.

२. आदिवासी परधान जमातीचे स्वतंत्र लोकसाहित्य आहे.

३. लोकसाहित्याचा स्वतंत्र इतिहास आहे.

४. आदिवासीतील परधान जमातीच्या लोकसाहित्यातून रूढी, प्रथा-परंपरा यांचे यथार्थ दर्शन होते.

५. आदिवासी परधान जमातीचे लोकसाहित्य हे भिन्न संस्कृती दर्शविते.

६. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्यातून त्यांचे लोकजीवन, राहणीमान, अलंकार,वेशभूषा स्पष्ट दिसते.

Ø **संशोधनाचे महत्व :-**

आदिवासी परधान जमाती मधील लोकसंस्कृती, लोकजीवन व लोकसाहित्य याचा सखोल अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी हे संशोधन कार्य हाती घेतले असून, आदिवासी जमाती मध्ये असलेल्या, वेगवेगळ्या जमातीचे वेगळे अस्तित्व जगासमोर प्रतिबिंबित करण्यासाठी, या संशोधनाचे अनन्यसाधारण असे महत्त्व असणार आहे. लोकसाहित्या मध्ये आदिवासीं चे लोकसाहित्य त्यातही आदिवासी जमातीतील परधान जमातीचे वेगळे लोकसाहित्य आहे. याचा शोध संशोधक घेणार असल्यामुळे, संशोधन क्षेत्रात व साहित्य क्षेत्रात प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व नक्कीच निर्माण होणार आहे. संशोधकाने 'किनवट व माहूर' तालुक्यांतील आदिवासी परधान जमातीतील लोकसाहित्यात असलेल्या अनेक बाबीं चा अभ्यास करण्याचे ठरवले आहे.

म्हणून हे संशोधन आदिवासी साहित्य, मराठी साहित्य, लोकसाहित्य इत्यादी क्षेत्रांसाठी महत्वपूर्ण माहिती उपलब्ध करून देणारे आहे. म्हणून हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे.

Ø **संशोधनाची गरज :-**

आदिवासी जमातीतील लोकसाहित्याचे संशोधन अनेक संशोधकांनी केलेले दिसते. परंतु आतापर्यंत आदिवासी जमातीतील वैशिष्ट असलेल्या परधान जमातीचा अभ्यास क्वचितच आढळतो. आदिवासी परधान जमातीत असलेले वेगळेपण, त्यांचे लोकजीवन, त्यांची संस्कृती, त्यांचे लोकसाहित्य जगासमोर येणे गरजेचे आहे. लोकसाहित्यामध्ये विविध क्षेत्राचा अभ्यास करत असताना आदिवासीतील या विशिष्ट चालीरीती, विशिष्ट संस्कृती, लोकजीवन साहित्य लाभलेल्या परधान जमातीचा उल्लेख लोकसाहित्या मध्ये झाला पाहिजे. यासाठी त्यांच्या संदर्भाने संशोधन होणे, ही काळाची गरज असल्यामुळे संशोधकाने ‘किनवट व माहूर’ तालुक्यांतील वैशिष्ट असलेल्या या समुदायातील परधान जमातीचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे. यातून परधान जमातीच्या लोक साहित्याचा परिचय होणार आहे. संशोधकाने आदिवासीतील परधान जमातीचे वैशिष्ट्य पूर्ण जीवन त्यांच्या लोकसाहित्यातून कसे जगासमोर आणले जाईल, ज्यातून परधान जमातीचा विकास होऊन, त्यांच्यात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सलोखा निर्माण होईल, असा सर्वसमावेशक दृष्टिकोन जो की, आदिवासी परधान जमातीसाठी गरजेचा आहे. ही गरज लक्षात घेऊन आदिवासी परधान जमातीतील लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले आहे.

Ø **संशोधन पध्दती :-**

'संशोधन' हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाला मराठी भाषेतील पर्यायी शब्द आहे. संशोधन या मराठीतील शब्दाची उत्पत्ती लक्षात

घेतली असता सं + शोधन = याचा अर्थ शोध घेणे, चौकशी करणे, 'काळजीपूर्वक तपास करून सत्यशोधनाचा शास्त्रीय प्रयत्न करणे म्हणजे संशोधन होय'. इंग्रजी शब्दकोषानुसार संशोधन म्हणजे 'कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तत्थे शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे यांचे पुन्हा-पुन्हा आदिवाचन करण्यासाठी केलेला चिकित्सक पद्धतशीर अभ्यास होय'. प्रस्तुत संशोधनात, '**आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास'** करण्यासाठी विशेष संदर्भ म्हणून **'किनवट व माहूर'** तालुक्यांतीची निवड करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने **'सर्वेक्षण'** पद्धतीचा वापर करण्याचे ठरविले आहे. आदिवासी परधान जमातीतील लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे, सर्वेक्षण पद्धतीतील साधने व तंत्रे प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरणार असल्यामुळे, सर्वेक्षण पद्धतीचा वापर हे संशोधन पूर्ण करण्यासाठी केला जाणार आहे.

Ø **नमुना पध्दती:-**

नमुना पद्धती हा संशोधनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपण दैनंदिन जीवनात ही नमुना पडताळणी करतो. उदा:- 'भाताची परीक्षा शितावरून' आपण करतो अगदी याच पद्धतीने लोकसाहित्याच्या अभ्यासातही नमुना पद्धतीला महत्त्व आहे. **"नमुना हा विश्व किंवा समग्रातून निवडण्यात आलेला भाग आहे."** विशिष्ट अध्ययनात काही निश्चित वैशिष्ट्ये त्या जमातीच्या लोकसाहित्यात असतात. प्रस्तुत संशोधनात **'आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास'** या विषयाचा अभ्यास करताना संशोधनात वस्तुनिष्ठता यावी व संशोधन कार्य सत्याप्रत जावे यासाठी लोकसाहित्याच्या समग्राचा एक भाग म्हणून 'किनवट व माहूर' तालुक्यांतील आदिवासी परधान जमातीच्या

लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. किनवट व माहूर तालुक्यांत आदिवासी परधान जमात संख्येने बऱ्यापैकी आहे. प्रस्तुत संशोधनात नमुना निवडताना 'सहेतुक नमुना निवड' पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

Ø **संशोधनाची साधने व तंत्रे :-**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात येईल. प्रश्नावली व्दारे संकलित माहितीचे विश्लेषण करताना उत्तरदात्यांची नावे, पत्ता व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या लोकसाहित्य मधील लोकगीते, लोककला, लोककथा याचा अभ्यास केला जाईल. संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्ञानकोश, विश्वकोश, संस्कृतीकोश व संदर्भग्रंथ आणि महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात या विषयांतर्गत संशोधनावर सादर केलेले शोधप्रबंध यांचा प्राथमिक सामग्री म्हणून अभ्यास केला जाईल. तर दुय्यम सामग्री म्हणून नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे यांचा अभ्यास करण्यात येईल.

Ø **अभ्यास विषयातील संकल्पना:-**

प्रस्तुत अभ्यास विषयात लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोककला, लोकगीते, म्हणी, वाक्यप्रचार, समाज, रूढी, प्रथा-परंपरा, श्रध्दा-अंधश्रध्दा, आधुनिकता, परिवर्तन, पारंपरिकता इत्यादी संकल्पना असून संशोधनाच्या प्रगतीनुसार त्यांचा अर्थ स्पष्ट केला जाईल.

Ø **संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:-**

प्रस्तुत संशोधन समस्येशी संबंधित संशोधन कार्य करण्यासाठी 'किनवट व माहूर' तालुक्यांतील **'आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य : एक चिकित्सक अभ्यास'** या समस्येच्या संदर्भाने ‘किनवट

व माहूर' तालुक्यात उपलब्ध असलेले लोकसाहित्य, संदर्भिय साहित्य व माहिती तथ्य संकलनसाठी वापरली जाईल. हे संशोधन विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. प्रस्तुत संशोधनात वस्तुनिष्ठ माहिती संकलन करून संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.हे संशोधन केवळ 'किनवट व माहूर' तालुक्यातील आदिवासीतील परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यासा पुरते मर्यादित राहिल.

Ø **प्रकरण योजना :-**

:: प्रकरण पहिले ::

विषय प्रवेश

प्रस्तुत संशोधनाच्या संशोधन विषयाची सुरवात या प्रकरणातून होईल. म्हणजेच संशोधन कार्याचा प्रारंभ केला जाईल. आदिवासीतील परधान जमातीच्या संदर्भात माहितीची ओळख करून, संशोधन कार्य केले जाईल.

:: प्रकरण दुसरे ::

आदिवासी परधान जमातीची ओळख.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आदिवासी परधान जमातीच्या उत्पत्तीचा इतिहास मांडण्यात येईल. व त्या अनुषंगाने भारतामध्ये परधान आदिवासी जमातीची व्याप्ती कशी वाढत गेली. याचा अभ्यास करून, महाराष्ट्रातील परधान आदिवासी जमातीचे स्वरूप स्पष्ट करण्यात येईल. त्याचबरोबर 'किनवट व माहूर' तालुक्यातील आदिवासी परधान जमात, त्यांचे व्यवसाय, त्यांची कौटुंबिक स्थिती, सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्थिती या संदर्भात सखोल सविस्तर माहिती देण्यात येईल.

:: प्रकरण तिसरे ::

लोकसाहित्य म्हणजे काय ?

प्रस्तुत प्रकरणांमध्ये लोकसाहित्याची संकल्पना स्पष्ट केली जाईल. त्याच बरोबर लोकसाहित्य म्हणजे काय?, लोकसाहित्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये याचा सविस्तर अभ्यास केल्या जाईल.

:: प्रकरण चौथे ::

आदिवासी परधान जमातीचे लोकसाहित्य.

सदर प्रकरणांमध्ये 'किनवट व माहूर' तालुक्यातील आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास केल्या जाईल. आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्या मध्ये येणारी लोकगीते, लोककला, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार यांचा अभ्यास केल्या जाईल.

:: प्रकरण पाचवे ::

आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचे वेगळेपण.

महाराष्ट्रातील इतर लोकसाहित्य त्यात आदिवासी परधान जमातीच्या लोकसाहित्याचे वेगळेपण हे प्राचीन काळापासूनच वैशिष्ट्यपूर्ण आहे. परधान जमातीची जीवनपद्धती, संस्कृती, रूढी-परंपरा, देव-देवता, व्रत-वैकल्य इत्यादीं चा अभ्यासकेला जाईल. तसेच आदिवासी परधान जमातीची जीवनपध्दती ही इतर समाजाच्या जीवनपद्धती पेक्षा स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण असून त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या लोकसाहित्यातून उमटलेले आहे. ते कसे आहे, याची सविस्तर मांडणी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

:: प्रकरण सहावे ::

उपसंहार व निष्कर्ष.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संपूर्ण संशोधनावरून उपसंहार मांडण्यात येईल व त्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्यात येतील.

Ø **संदर्भ ग्रंथसूची**

१. डॉ. गावित माहेश्वरी, आदिवासी लोकपरंपरा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद मार्च-२०१५

२. डॉ. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य स्वरूप व समस्या, विजय प्रकाशन, नागपूर.

३. देवगावकर शैलजा, महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

४. प्रा.डॉ. गावित पुष्पा , आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव ऑक्टोंबर-२०१४.

५. नागगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,२००३,

६. गोविंद गारे,महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,

७. डॉ.सुधीर बोधनकर, प्रा.विवेक आलोनि, अँड. मृणाल कुलकर्णी, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती,२०११.

८. डॉ.वी.रा. भिंताडे, शैक्षणिक संशोधन पध्दती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१८

९. डॉ.संजय लोहकरे, आदिवासी लोकसाहित्य शोध आणि बोध, मेधा पब्लिशिंग हाऊस.

१०. कुलकर्णी शौनक , महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंन प्रकाशन , पूणे, प्रथमावृत्ती -२००६.

११. गारे गोविंद, आदिवासी लोकनृत्य (लय,ताल, आणि सूर) ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, प्रथमावृत्ती - २००४.

१२. देवगावंकर एस.जी., डॉ. देवगावंकर शैलेजा ,गोंड, परधान आणि कोलाम, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर , प्रथमावृत्ती – २०११.

संशोधक. **मार्गदर्शक**

अजय मारोती पाटील. प्रा.डॉ.राजू श्रावण मोतेराव